# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती आय

ता. वसई, जि. पालघर

जावक क्र. वविशम/प्रसआय/दिवा/ ३०८१ /२०१६-१७

दि. १३ / २ / २०१७

## जाहिर सुचना

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यालयातील तामतलाव येथे नव्याने बांधण्यात आलेल्या तलावाभोवती आकर्षक पोल उभारुन कायान्वित करणेचे आहे. तरी महापालिकेच्या अटी व शर्थीस अधिन राहुन जाहिर सुचना प्रसिध्द करणेत येत आहे. सदर कामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील इच्छुक विद्युत परवाना धारक / नोंदणीकृत ठेकेदाराकडुन कामाची दरपत्रके प्रसिध्दीच्या दिवसापासुन दिनांक- २२ /२ /२०१७ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत प्रभाग समिती (आय) वसई कार्यालयात मागविण्यात येत आहे. ठेकेदारांनी खाली नमुद केलेल्या अंदाजपत्रकानुसार स्वत:च्या लेटर हेडवर कोटेशन सादर करावयाची आहेत. प्राप्त झालेली दरपत्रक शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ४.०० वाजता हजर ठेकेदार वा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांच्या समोर प्रभारी सहा. आयुक्त यांच्या दालनात उघडण्यात येतील सदर कामी प्राप्त एक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकारी महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

## ESTIMATE

**PWD DSR 2015-16**

| NO | DESCRIPTION | DSR | UNIT | QTY | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing Aluminum garden pole 4.2 mtr 165 x105 x 70 mm with fabricating, baes plate, hardeware, moulding & spray painting as per design complete | R.A | Nos | 11.00 | 26800.00 | 294800.00 |
| | | | | | Total Rs | 294800.00 |
| | | | | | Say Rs | 294800.00 |

## कामाचे दर

| अ क्रं. | कामाचा तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | तामतलाव येथे नव्याने बांधण्यात आलेल्या तलावाभोवती आकर्षक पोल उभारणे. | अंदाजपत्रकिय दरावर<br>अंकि-----------------%<br>अक्षरी -------------------------------------------%<br>कमी / जास्त दराने काम करण्यास तयार आहे. |

## कामाबाबतच्या अटी व शर्थी

१. अंदाजपत्रिकय दरावर टक्केवारी स्वरुपात दर मागविण्यात येत असुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मान्यता प्राप्त विद्युत परवाना धारक/नोंदणीकृत विद्युत ठेकेदारांकडुन दरपत्रके मागविण्यांत येत आहेंत. उशीराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करुन स्वाक्षांकित न केलेले, सिलबंद न केलेले व सर्शत दरपत्रक फेटाळण्यात येतील. कोणतेही अथवा सर्व दरपत्रक कारण न देता नाकारणेचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

२. सदरचे काम उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन अंदाजपत्रकाप्रमाणे पुर्ण करुन देणेस ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३. प्रत्यक्ष काम चालू असताना आजुबाजुच्या नागरिकाना, रहदरीचा त्रास, उपद्रव/ वा हानी होणार नाही याची जबाबदारी ठेकेदाराची असेल व तसेच अशा वेळी कोणाचीही आर्थिक /जिवितहानी झालेस त्याची नुकसान भरपाई ठेकेदारांना करुन दयावी लागेल याबाबत आवश्यक ते विमा संरक्षण घेणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

४. सदरचे काम ठेकेदारास ३० दिवस मुदतीत पुर्ण करावे लागेल व कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच अपवादात्मक परिस्थितीत मा. उपायुक्त यांचा निर्णय अंतीम राहिल

५. काम मुदतीतत न झाल्यास प्रथम : प्रतिदिन रु १००/- एवढा दंड ठेकेदाराना अदा करावा लागेल व तसेच कामात प्रगती न आढळयास दंडाची रक्कम वाढविण्यात येईल.

६. ठेकेदारांना कामासाठी कार्यादेश दिलेनंतर त्वरीत कामाची सुरवात करावी लागेल व सदर कामात हयगय केल्यास सदरचा मक्ता रद्द करुन त्याबाबत महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्यास ते मुळ ठेकेदाराकडुन वसुल करण्याचा अधिकार महापालिकेस राहिल.

७. ठेकेदारांच्या देयकातुन सुरक्षा अनामत व आयकराची प्रचलित दरानुसारची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल तसेच सुरक्षा अनामतीची रक्कम सुरक्षा कालावधीत (६ महिने) यशस्वीरित्या पूर्ण झाले नंतर अदा केले जाईल

८. प्रत्यक्ष काम चालु असताना कामाच्या प्रकारात बाबींच्या परिणामात चढ/ उतार / घट / वाढ झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही ठेकेदारास करावी लागेल.

९. कामाचे देयक अदा केले नंतर भविष्यात सदर कामी महानगरपालिकेच्या लेखा परिक्षणात आक्षेप आल्यास फरकाची/ वा आक्षेपा पोटीची भरपाईची रक्कम ठेकेदारास बिना शर्त अदा करावी लागेल.

१०. महापालिकेकडे उपलब्ध तरतुद व निधी नुसार सदर कामाचे देयक अदा करण्यात येईल.

११. काम भारतीय विज अधिनियम १९५६ (सुधारीत) नुसार करणे विद्युत ठेकेदारावर बंधनकारक राहील.

उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी
प्रभाग समिती आय
वसई विरार शहर महानगरपालिका